# वंचित घटकांनाही जगण्याचा हक्क हवा

## सामाजिक कार्यकर्त्या मीना शेषू यांचे प्रतिपादन; कमला कॉलेजमध्ये राष्ट्रीय चर्चासत्रातील सूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

वंचित घटकांना महापुरुषांच्या जयंती करण्याचा अधिकार सत्ताधाऱ्यांकडून नाकारला जातो. सत्ताधाऱ्यांनी वंचितांवरल्या अत्याचाराविरोधी समाजाने आवाज उठवण्याची गरज आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यानुसार वंचित घटकांनाही जगण्याचा अधिकार पाहिजे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या मीना शेषू यांनी केले.

कमला कॉलेजमध्ये आयोजित विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये 'मानवी हक्कांचे स्वरूप आणि वास्तव' या विषयावर प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. जे. बी. पाटील होते. सामाजिक कार्यकर्त्या मीना शेषू म्हणाल्या, समाजातील वेश्या, हिजडा, एचआयव्हीग्रस्त लोकांशी सुसंवाद झाला पाहिजे. न्यायाधीश वर्मा कमिशननुसार शासनाकडून वंचित घटकांच्या पुनर्वसनासाठी लोणची, पापड व्यवसायांचे अमिष दाखवले जाते, हीच मुळी चुकीची गोष्ट आहे. ज्यांचा व्यवसाय नाही त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. मानव अधिकाराचे काम तळागाळातून झाले पाहिजे. मानवी हक्काबद्दल जशी जागृकता आहे, तशी मानवी अधिकाराबद्दल जागृकता हवी. प्रत्येक घटकाबद्दल आणि सामाजिक प्रश्नावर कायदे झाले. मात्र, या कायद्याची अंम्मलबजावणी झालेली नाही. कुपोषणामुळे बालमृत्यू होण्याचे प्रमाण महाराष्ट्रात जास्त आहे. शासकीय योजनांची घोषणा होते मात्र वंचितांना संबंधित योजनांच्या घोषणेंतर्गत हक्क मिळत नाहीत. त्याचबरोबर शुध्द हवा, पाणी, पर्यावरण, कसे शाबूत राहील याकडे लक्ष देण्याची गरज आहे.



कोल्हापूर : कमला कॉलेजच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन करताना डावीकडून सुजय पाटील, सामाजिक कार्यकर्त्या मीना शेषू, डॉ. क्रांतिकुमार पाटील, स्कॉट कफोरा, संजय पाटील.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. जे. बी. पाटील म्हणाले, स्त्रियांवरील अन्याय अत्याचार थांबण्यासाठी त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली पाहिजे. तसेच मानवी हक्क आणि अधिकाराविषयी प्रबोधन करण्याची गरज आहे. महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी चर्चासत्राचे महत्त्व विशद केले.

दुसऱ्या सत्रात स्कॉट कफोरा यांनी 'आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानवी हक्कांच्या चळवळी या संदर्भातील अनुभव व स्कॉट यांचे कार्य' या विषयावर मार्गदर्शन केले. संजय पाटील यांनी अवनि या संस्थेची ओळख व कार्य या विषयावर 'अवनि' डॉक्युमेंटरीचे सादरीकरण केले. तिसऱ्या सत्रात सहभागी प्राध्यापकांनी निबंध वाचन केले.

चौथ्या सत्रात समारोपप्रसंगी अॅड. के. ए. कापसे यांनी 'मानवी हक्क आणि कायद्याची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. अनघा पाठक, डॉ. नीता धुमाळ, डॉ. व्ही. व्ही. मैंदर्गी यांनी केले. आभार डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी मानले.

यावेळी डॉ. सुजय पाटील, प्रा. अनिल घस्ते, प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

तरुण भारत
21 जानेवारी 2016

Scanned by CamScanner